तरुण भारत
शनिवार, १६ फेब्रुवारी २०१९

# महाडिक अभियांत्रिकीत गुरुवारपासून 'खेल मेनिया'

**इस्लामपूर :** येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये गुरूवारी २१ फेब्रुवारी २०१९ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालयांतर्गत 'खेल मेनिया २०१९' चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मुलांच्या व मुलींच्या बुध्दिवळ, बॅडमिंटन आणि मुलांच्या फुटबॉलच्या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संघ सहभागी होणार आहेत, अशी माहिती संस्थेचे सचिव राहूल महाडिक यांनी दिली. महाडिक पुढे म्हणाले, या स्पर्धेचे उदघाटन राष्ट्रीय बुध्दिवळ प्रशिक्षक दापक वायचळ तसेच व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहूल महाडिक, कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी इत्यादी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच शारीरिक क्षमता व विविध खेळांचे कौशल्यांचे प्रदर्शन करण्याचा संधी मिळेल तसेच दररोजच्या दिनक्रमातून होणाऱ्या मानसिक व शारीरिक ताण-तणावातून विद्याध्यांना मुक्त करण्यासाठी अशा प्रकारचे प्रयत्न नेहमाच महाविद्यालयामध्ये राबवण्यात येतात, असे मत महाडिक यांनी व्यक्त केले.